शनिवार दि. ३० मे २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २६८ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

वेदनाहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

आमदार बबनराव लोणीकर यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

## जालना जिल्ह्यासाठी ६ कोटी ४६ लाख १० हजार ९३२ रुपयांचा निधी मंजूर

### मंठ्यासह जालना जिल्ह्यातील रखडलेल्या मनरेगा कामांना मिळाला दिलासा

**जालना -प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रातील २ लाखांपेक्षा अधिक मनरेगा मजुरांची तब्बल १७० कोटी रुपयांची मजुरी थकीत असल्याचा गंभीर मुद्दा आमदार बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत आक्रमकपणे उपस्थित करून राज्य सरकारचे लक्ष वेधले. रोजगार हमी योजनेअंतर्गत काम करणाऱ्या लाखो मजुरांना स्वतःच्या कष्टाची मजुरी वेळेवर मिळत नसल्याने ग्रामीण भागात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळातही मजुरांच्या खात्यात मजुरी जमा न झाल्याने अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले आहे. शासनाने मजुरांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत लोणीकर यांनी सरकारला धारेवर धरले. रोजगार हमी योजनेंतील अनियमितता आणि निधीअभावी ग्रामीण अर्थव्यवस्था डळमळीत होत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



आमदार बबनराव लोणीकर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करून रोजगार हमी विभागातील गंभीर बाबी सभागृहासमोर मांडल्या. जालना जिल्ह्यात मजुरांचे १८ कोटी ७८ लाख रुपये तर मटेरियलचे तब्बल १०६ कोटी ७२ लाख रुपये प्रलंबित असल्याची माहिती त्यांनी दिली. परतूर विधानसभा मतदारसंघात मजूर आणि मटेरियल मिळून ५० कोटी १३ लाख रुपये थकीत असल्यामुळे अनेक विकासकामे रखडली असल्याचा मुद्दाही त्यांनी अधोरेखित केला. पावसाळ्यापूर्वी पूर्ण झालेल्या कामांची मजुरी तांत्रिक अडचणीच्या नावाखाली रोखून ठेवण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. राज्यातील लाखो मजुरांवर उपासमारीची वेळ येत असल्याने सरकारने तात्काळ निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

आमदार बबनराव लोणीकर यांच्या सातत्यपूर्ण आणि आक्रमक पाठपुराव्यालाच अखेर मोठे यश मिळाले असून जालना जिल्ह्यासाठी तब्बल ६ कोटी ४६ लाख १० हजार ९३२ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रोजगार हमी मंत्री भरत गोगावले आणि रोजगार हमी विभागाच्या प्रधान सचिवांकडे वारंवार पाठपुरावा करून लोणीकर यांनी हा (पान २ वर)

## ज्या ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत त्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या

### मनोज जरांगेंची मागणी, आंदोलनावर ठाम?

मुंबई - राज्य सरकार म्हणतंय कुणबीच्या ५८ लाख नोंदी सापडल्या, मग त्या जाहीर करा, त्या सर्वांना प्रमाणपत्र द्या अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली. आधीच्या राज्यकर्त्यांनी मराठ्यांसाठी काही केलं नाही, म्हणून तुम्हाला सत्तेत आणलं, मराठ्यांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करा अशी मागणीही यावेळी मनोज जरांगे म्हणाले. हैदराबाद गॅझेटप्रमाणे सातारा गॅझेटचा जीआर काढा, मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देणार हे लेखी द्या अशी मागणीही यावेळी मनोज जरांगे यांनी केली. मराठा समाजासाठी तुम्हाला जेवढं शक्य आहे तेवढं करा, मी आंदोलन करणारच असा इशाराही त्यांनी दिला.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे हे ३० मे पासून अंतरावाली सराटीमध्ये आंदोलन करणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेतली आणि आरक्षणाच्या मागणीवर चर्चा केली. या शिष्टमंडळात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार



प्रसाद लाड होते.

शिष्टमंडळासोबत चर्चा करताना मनोज जरांगे म्हणाले की, ''राज्य सरकारने या आधी हैदराबाद गॅझेटचा जीआर काढला, पण (पान २ वर)

## विशाल वाकडे यांचे माणुसकीचे दर्शन, रक्तदान करून कोमल मोरे यांचे वाचवले प्राण

**दत्ता देशमुख**

खानापूर येथील एका भगिनीला ओ निगेटिव्ह रक्ताची तातडीची गरज असताना जाफ्राबादचे पत्रकार विशाल पाटील वाकडे यांनी माणुसकीचे अनोखे दर्शन घडवले. शिर्डी साईदर्शनाहून परतत असताना आलेला फोन ऐकून त्यांनी थेट छत्रपती संभाजीनगर गाठले आणि स्वतः रक्तदान करून कोमल विष्णू मोरे या रुग्णाचे प्राण वाचवले.

बुधवारी विशाल वाकडे शिर्डी येथे साईबाबांच्या दर्शनासाठी गेले होते. परतीच्या प्रवासात त्यांना खानापूरचे ऋषींद्र पाटील शेळके यांचा फोन आला. घाटी रुग्णालयात कोमल

मोरे यांना ओ निगेटिव्ह रक्ताची तातडीने गरज असून असून श्री सत्य साई ब्लड



बँकेतही रक्त उपलब्ध नसल्याची व्यथा त्यांनी मांडली.

शिडाहून योगायोगाने विशाल वाकडे यांचा रक्तगटही ओ निगेटिव्ह असल्याने क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी स्वतः येऊन रक्तदान करणार असल्याचे सांगितले. शिर्डीहून निघालेले वाकडे थेट छत्रपती संभाजीनगरच्या श्री सत्य साई ब्लड बँकेत पोहोचले. तिथे रक्तदान करून त्यांनी कोमल मोरे यांना वेळेत रक्त उपलब्ध करून दिले. यावेळी त्यांच्यासोबत प्रा. सचिन शिवनाथ पाटील वाकडे, मंगेश अरुण पाटील गायके आणि दीपक पाटील गायकवाड उपस्थित होते.

पत्रकार विशाल पाटील वाकडे हे छत्रपती संभाजी ब्रिगेडचे जाफ्राबाद तालुकाध्यक्ष आहेत. दुर्मिळ ओ निगेटिव्ह रक्तगट असल्याने त्यांच्या या दातृत्वाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या प्रसंगानंतर बोलताना वाकडे यांनी सांगितले की, साईदर्शनाचा योग आणि रक्तदानाची संधी एकाच दिवशी आली. एका भगिनीच्या कामी येता (पान २ वर)

## पोस्टाद्वारे ऑनलाईन तलवार मागवणारा युवक अटकेत

**दहशतवाद विरोधी पथकाची धडक कारवाई**

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात ऑनलाईन पद्धतीने तलवार मागवून ती पोस्टाद्वारे स्वीकारणाऱ्या एका युवकाला दहशतवाद विरोधी पथकाने अटक करत त्याच्याकडून एक तलवार जप्त केली आहे. अवैधरित्या शस्त्र बाळगून दहशत निर्माण करणाऱ्यांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल



करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २९ मे २०२६ रोजी पोलीस अधीक्षक तसेच अपर पोलीस अधीक्षक यांनी जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्या व दहशत निर्माण करणाऱ्या इसमांविरोधात विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार दहशतवाद विरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगेवाड व त्यांच्या पथकाने माहिती संकलन सुरू केले होते.

दरम्यान, गुप्त बातमीदारामार्फत पोलिसांना माहिती मिळाली की, शिवाजी पुतळा परिसरातील पोस्ट ऑफिसमध्ये ऑनलाईन पद्धतीने तलवार मागविण्यात आली असून संबंधित इसम ती घेण्यासाठी येणार आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी परिसरात सापळा रचला. पोस्ट ऑफिस परिसरात संशयित हालचाली करणाऱ्या युवकाला पोलिसांनी ताब्यात घेत चौकशी केली असता त्याचे नाव सिद्धेश्वर एकनाथ राठोड (वय २४, रा. म्हाडा (पान २ वर)

प्रभाग १६ मधील घंटागाडी सेवा ठप्प

## महापालिकेत कचरा टाकण्याचा अमोल ठाकूर यांचा इशारा

**जालना । प्रतिनिधी**



प्रभाग क्रमांक १६ मधील अंबड रोड, आनंदनगर, महसूल कॉलनी, रूपनगर, सत्कार नगर, यशवंत नगर, हनुमान नगर, योगेश नगर, अयोध्या नगर, भाग्योदय नगर, सटवाई तांडा, खडकतलाव, सोरटी नगर तसेच परिसरातील इतर भागांमध्ये घंटागाडी सेवा विस्कळीत झाल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिसरात दोन घंटागाड्या सुरू असल्या तरी त्यापैकी एक घंटागाडी वारंवार बंद पडत असल्याने कचरा संकलनावर परिणाम होत आहे. यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या समस्येबाबत नागरिकांनी नगरसेवक अमोल ठाकूर यांच्याकडे तक्रारी केल्यानंतर त्यांनी महानगरपालिकेकडे निवेदनाद्वारे घंटागाडी सेवा तात्काळ सुरळीत करण्याची मागणी केली होती. मात्र, प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप त्यांनी केला (पान २ वर)

## चार महिन्यांपासून फरार असलेला आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात; अल्पवयीन मुलीची सुटका

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अखेर चार महिन्यांनंतर जेरबंद केले असून पीडित मुलीची सुरक्षित सुटका करण्यात आली आहे. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या या कारवाईमुळे पोलिसांना मोठे यश मिळाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खादगाव (ता. बदनापूर, जि. जालना) येथील ३९ वर्षीय महिलेने दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी चंदनझिरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांच्या अल्पवयीन मुलीला दीपक राजू जाधव (रा. माळशेंद्रा, ता. जि. जालना) याने अज्ञात कारणासाठी फूस लावून पळवून नेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. या प्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १३७(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेनंतर चंदनझिरा पोलीस ठाणे तसेच अनैतिक मानवी वाहतूक



प्रतिबंध कक्ष, जालना यांच्या पथकांनी आरोपी व पीडितेचा शोध घेण्याचे प्रयत्न केले. मात्र चार महिन्यांहून अधिक काळ उलटल्यानंतरही दोघांचा ठावठिकाणा लागत नव्हता. त्यामुळे या गंभीर गुन्ह्याचा तपास २१ मे २०२६ रोजी पोलीस अधीक्षकांनी स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला.

पोलीस अधीक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक व त्यांच्या पथकाला आरोपीचा शोध घेण्याच्या विशेष सूचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक विश्लेषण, मोबाईल लोकेशन व अन्य माहितीच्या आधारे तपास सुरू केला. दरम्यान, दिनांक २८ मे २०२६ रोजी आरोपी व पीडिता हे राजणगाव परिसरातील माऊलीनगर, कमळापूर (ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) (पान २ वर)

# जालना शहरात अस्वच्छतेचा विळखा

### नाले तुंबले, रस्त्यांवर कचऱ्याचे साम्राज्य, नागरिक संतप्त

**जालना -प्रतिनिधी**

: पावसाळ्याच्या तोंडावर जालना शहरातील स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला असून शहरातील विविध भागांत नाले तुंबणे, रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग आणि दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. महानगरपालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शहरात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरल्याची तीव्र भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली असून ''जालना शहर अस्वच्छतेचे माहेरघर झाले आहे का?'' असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



शहरातील घायाळ नगर परिसरातील मोठ्या नाल्यात मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला असून अनेक दिवसांपासून त्याची साफसफाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे नाल्यातील सांडपाणी अडून दुर्गंधी पसरत आहे. पावसाळ्यात हा नाला तुंबल्यास परिसरात पाणी साचण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. तसेच रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला दिसून येत आहे. रस्त्याच्या कडेला पडलेल्या कचऱ्यामुळे परिसर अस्वच्छ झाला



असून ये-जा करणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे. शहरातील महापुरुषांच्या पुतळ्याजवळील नाल्यांमध्येही कचरा साचल्याने परिसराची दुर्दशा झाली आहे.

स्टेशन रोड ते नूतन वसाहत मार्गावरील राजाराम प्रवेशद्वारासमोर चिकन व मटण विक्रेत्यांकडून टाकण्यात येणाऱ्या वेस्टेजमुळे परिस्थिती आणखी गंभीर बनली आहे. या भागात मोठमोठे कॉम्प्लेक्स, दुकाने आणि रहिवासी वसाहती असतानाही स्वच्छता



विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. चिकन-मटण दुकानांमधील टाकाऊ अवशेष रस्त्यालगत फेकले जात असल्याने संपूर्ण परिसरात तीव्र दुर्गंधी (पान २ वर)

**''विभागीय आयुक्तांनी मनपा प्रशासनाचे कान टोचावेत'' नागरिकांची मागणी**

जालना शहरात वाढत चाललेल्या अस्वच्छता, तुंबलेले नाले, रस्त्यांवरील कचरा आणि सांडपाण्याच्या समस्येमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून या गंभीर प्रश्नाची प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी जोरदार मागणी शहरवासीयांकडून होत आहे. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील अनेक मोठे नाले अद्याप साफ करण्यात आलेले नसल्याने पूरस्थिती, दुर्गंधी आणि साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे. संग्राम नगर, घायाळ नगर, स्टेशन रोड, नूतन वसाहत, पाणीवेस, राजमहल परिसर आदी भागांमध्ये (पान २ वर)

# संपादकीय...

## जालन्यातील एसीबी कारवाई : भ्रष्टाचाराविरुद्धचा इशारा की व्यवस्थेतील खोलवरची पोकळी?

जालना महानगरपालिकेतील अतिक्रमण निर्मूलन विभागातील दोन अधिकाऱ्यांना ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंध विभागाने रंगेहात पकडल्याची घटना ही केवळ एक गुन्हेगारी कारवाई नसून, स्थानिक प्रशासनातील भ्रष्टाचाराचे वास्तव पुन्हा एकदा समोर आणणारी घटना ठरली आहे. शहरातील नालेसफाई आणि अतिक्रमण हटविण्यासारख्या थेट जनहिताच्या कामासाठीही नागरिकांना लाचेची मागणी सहन करावी लागत असेल, तर ही बाब प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न निर्माण करणारी आहे.

विशेष म्हणजे या प्रकरणातील तक्रारदार हे एक सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांनी शहरातील मामा चौक ते कोलू तेली घाणा संघ परिसरातील नाल्यावर झालेले अतिक्रमण हटविणे आणि नालेसफाई करण्यासाठी महानगरपालिकेकडे अधिकृत निवेदन दिले होते. म्हणजेच त्यांनी कोणतेही वैयक्तिक काम किंवा बेकायदेशीर मागणी केली नव्हती. शहराच्या स्वच्छतेशी आणि नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असलेल्या कामासाठी पाठपुरावा करताना त्यांना ''कामासाठी खर्च येईल'' असा अप्रत्यक्ष संदेश देत लाचेची मागणी झाल्याचा आरोप आहे. ही बाब अधिक चिंताजनक आहे.

**भ्रष्टाचाराची साखळी किती खोलवर?**

महानगरपालिका, महसूल, बांधकाम, अतिक्रमण, पाणीपुरवठा अशा विभागांमध्ये नागरिकांना अनेकदा फाईल हलविण्यासाठी किंवा नियमित कामासाठी पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येतात. अनेकदा नागरिक भीतीपोटी किंवा काम अडू नये म्हणून तडजोड करतात. त्यामुळे भ्रष्टाचाराचे जाळे अधिक बळकट होत जाते.

या प्रकरणात मात्र तक्रारदाराने धाडस दाखवत थेट एसीबीकडे तक्रार केली आणि त्यामुळे संपूर्ण प्रकरण उघडकीस आले. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, नागरिकांनी पुढे येऊन तक्रार केल्यास भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई शक्य आहे.

**एसीबीच्या कारवाईचे महत्त्व**

लाचलुचपत प्रतिबंध विभागाने केलेली सापळा कारवाई ही केवळ दोन अधिकाऱ्यांना पकडण्यापुरती मर्यादित नाही. अशा कारवाया प्रशासनातील इतर कर्मचाऱ्यांसाठीही मोठा इशारा असतात. ''लाच घेताना पकडले जाणार नाही'' हा जो गैरसमज असतो, त्याला अशा कारवायांमुळे मोठा धक्का बसतो.

विशेषतः या प्रकरणात पडताळणी, पंचासमक्ष प्रक्रिया आणि सापळा अशा सर्व कायदेशीर बाबी काटेकोरपणे पार पाडण्यात आल्या. त्यामुळे भ्रष्टाचाराविरोधातील कारवाई अधिक प्रभावी ठरते.

**अतिक्रमणाचा प्रश्न आणि राजकारण**

जालना शहरात अतिक्रमण हा दीर्घकाळापासून गंभीर विषय राहिला आहे. नाल्यांवरील अतिक्रमणांमुळे पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होते, रस्ते अरुंद होतात आणि स्वच्छतेच्या समस्या वाढतात. मात्र अनेकदा अतिक्रमण हटविण्याच्या कारवायांमध्ये राजकीय हस्तक्षेप, आर्थिक व्यवहार आणि निवडक कारवाईचे आरोप होत असतात.

अशा परिस्थितीत जर अतिक्रमण हटविण्यासाठीच लाच मागितली जात असेल, तर प्रशासनाच्या उद्दिष्टांवरच प्रश्नचिन्ह उभे राहते. नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित कामांमध्ये पारदर्शकता आणि जबाबदारी अधिक आवश्यक आहे.

**नागरिकांनीही पुढे येण्याची गरज**

भ्रष्टाचाराविरोधातील लढाई केवळ एसीबी किंवा सरकारची नसून ती समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. अनेकदा नागरिक ''काम व्हावे'' म्हणून पैसे देतात आणि त्यातून भ्रष्टाचार अधिक वाढतो. त्यामुळे अशा घटनांमध्ये तक्रार करण्याचे धाडस वाढणे आवश्यक आहे.

एसीबीने दिलेले टोल फ्री क्रमांक आणि व्हॉट्सअॅप हेल्पलाईन ही सामान्य नागरिकांसाठी महत्त्वाची साधने आहेत. त्यांचा योग्य वापर झाल्यास भ्रष्टाचारावर काही प्रमाणात नियंत्रण मिळवता येऊ शकते.

**कारवाईनंतरही मोठे आव्हान कायम**

एखाद्या अधिकाऱ्याला पकडणे ही सुरुवात असते, शेवट नाही. महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रशासन कोणती यंत्रणा उभी करणार? अंतर्गत तपासणी, ऑनलाइन प्रक्रिया, पारदर्शक कार्यपद्धती आणि जबाबदारी निश्चिती या गोष्टी अधिक प्रभावीपणे राबवाव्या लागतील.

जालना महानगरपालिकेतील ही घटना ही केवळ एका विभागापुरती मर्यादित नसून संपूर्ण प्रशासकीय व्यवस्थेला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडणारी आहे. भ्रष्टाचाराविरोधातील लढा सातत्याने आणि कठोरपणे चालू राहणे हीच काळाची गरज आहे.

# महाराष्ट्रासाठी नामुष्की

राष्ट्रीय परीक्षा एजन्सीकडून घेण्यात येणाऱ्या नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणी सीबीआयने आणखी एका क्लास चालक व त्याचा मुलाला अटक केल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचली. नीट पेपर फुटीचा तपास करणाऱ्या सीबीआयकडून आतापर्यंत १३ जणांना अटक केली असून त्यात अनेक मोठे मासे त्यांच्या गळाला लागले आहेत. सीबीआय या प्रकरणाचा तपास करत असल्याने आणखी मोठे मासे सीबीआयच्या गळाला लागण्याची शक्यता आहे तसेच अनेक धक्कादायक खुलासेही समोर येण्याची शक्यता आहे. सीबीआयने नीट पेपरफुटी प्रकरणी आतापर्यंत जे १३ आरोपी अटक केले आहेत त्यातील १० आरोपी हे महाराष्ट्रातील असल्याने या पेपर फुटीचे कनेक्शन महाराष्ट्राशी असल्याचे दिसून येत आहे. अर्थात ही महाराष्ट्रासाठी भूषणावह नाही तर लाजिरवाणी बाब आहे. लातूरमधील रसायन शास्त्राचा निवृत्त प्राध्यापक पी व्ही कुलकर्णी हा या पेपरफुटी मागचा मास्टर माईंड असल्याचे पुढे आले आहे. त्याच्या बरोबरच मनीषा मांढरे या जीवशास्त्राच्या प्राध्यपिकेलाही पेपरफुटी प्रकरणी सीबीआयने अटक केली आहे. महाराष्ट्रातील पुणे, नांदेड, लातूर, नागपूर नाशिक, अहिल्यानगर या जिल्ह्यांचे या घोटाळ्याशी थेट कनेक्शन आढळून आले आहे. विशेष म्हणजे विद्येचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या पुणे शहरातून आतापर्यंत पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. मनीषा गुरुनाथ मांढरे, मनीषा संजय हवालदार, पी व्ही कुलकर्णी, तेजस शाह व डॉ मनोज शिरुरे असे पुण्यातून अटक झालेल्या आरोपींची नावे आहेत तर लातूरमधून शिवराज मोटेगावकर, अहिल्यानगर मधून धनंजय लोखंडे, नाशिकमधून शुभम खैरनार असे महाराष्ट्रातून अटक झालेल्या आरोपींची नावे आहेत. विशेष म्हणजे अटक झालेले सर्व आरोपी उच्चशिक्षित डॉक्टर, प्राध्यापक क्लास चालक आहेत. लाखो रुपये पगार घेऊन प्राध्यापकी करणारे आणि ज्यांना देवमाणूस म्हणून समाजात मान दिला जातो अशा डॉक्टरांकडून अशा घटना घडणे धक्कादायक आहे. महाराष्ट्राच्या शैक्षणिक परंपरेला काळीमा फासणाऱ्याच या घटना आहेत. कोट्यवधी रुपये मिळवण्याच्या लालसेने हे उच्चशिक्षित लोक गुणवंत विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळत आहेत.

केंद्रीय शिक्षण विभागाचे देखील हे मोठे अपयश आहे. नीट पेपर फुटीमुळे शिक्षण विभागाचे लक्तरे वेशीला टांगली गेली आहेत. सर्वसामान्य नागरिकांचा आणि विद्यार्थ्यांचा परीक्षेवरील विश्वासच उडाला आहे. अर्थात नीट सारख्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेचा पेपर फुटण्याची ही पहिलीच वेळ नाही. मागील दहा वर्षात अशा विविध परीक्षांच्या पेपर फुटीच्या शेकडो घटना घडल्या आहेत. यामुळे परीक्षांच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नीट सारख्या वैद्यकीय परीक्षेच्या क्षेत्रात प्रवेश देणाऱ्या परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थी तळमळीने दोन दोन वर्ष अभ्यास करतात. रात्रीचा दिवस करून मेहनत घेतात. त्यांचे एकच स्वप्न असते ते म्हणजे नीट परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन डॉक्टर व्हायचे. मात्र त्यांचे हे स्वप्न ध्वस्त करण्याचे काम कुलकर्णी, मोटेगावकर सारखे लोक करतात. गोरगरीब आणि गुणवंत विद्यार्थ्यांचे स्वप्न हिरावून घेणाऱ्या या गुन्हेगारांना कठोरात कठोर शक्षिा व्हायला हवी. याआधीही असे प्रकार घडले होते तेंव्हाही काही आरोपींना अटक करण्यात आली होती मात्र त्यांच्यावर जरब बसेल अशी कारवाई झाली नाही त्यामुळेच असे घोटाळे पुन्हा पुन्हा घडत आहेत. कोणतेही गुन्हे केले तरी पैशाच्या जोरावर आपण सहिसलामत सुटू शकतो अशी भावना या गुन्हेगारांमध्ये निर्माण झाली आहे त्यामुळेच ते अशाप्रकारचा गुन्हा करुन विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळत आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नीट पेपर फुटी प्रकरणी दिलगिरी व्यक्त केली असली तरी ती पुरेशी नाही केंद्र सरकारने या प्रकरणात दोषी आढळणाऱ्या आरोपींवर मग तो कितीही मोठा आणि पैसेवाला असला तरी त्याच्यावर कठोर कारवाई केलीच पाहिजे. जोवर या लोकांवर जरब बसेल अशी कारवाई होत नाही तोवर या घटना थांबतील असे वाटत नाही. यातील सर्वाधिक आरोपी हे महाराष्ट्राचे असल्याने महाराष्ट्राची मानही शरमेने खाली झुकली आहे. महाराष्ट्रासाठी ही एकप्रकारची नामुष्कीच आहे त्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालणे गरजेचे आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# नाल्याच्या घाणीने संतप्त नागरिकांचा रास्ता रोको; संग्राम नगर परिसरात मनपाविरोधात तीव्र आंदोलन

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील संग्राम नगर परिसरात नाल्याच्या घाणीमुळे आणि सांडपाण्याच्या समस्येमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी शुक्रवारी सकाळी रास्ता रोको आंदोलन करत महानगरपालिका प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. बस स्टँड ते पोलीस कॉम्प्लेक्स मार्गावर झालेल्या या आंदोलनामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. विशेष म्हणजे आंदोलनात महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून आला. मिळालेल्या माहितीनुसार, संग्राम नगर परिसरातील मुख्य नाल्याची अनेक दिवसांपासून साफसफाई करण्यात आलेली नाही. नाल्यात मोठ्या प्रमाणात कचरा आणि गाळ साचल्याने सांडपाणी थेट रस्त्यावर वाहू लागले आहे. त्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर संतप्त नागरिकांनी आज सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास रस्त्यावर उतरून आंदोलन छेडले. आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, नाल्याचे घाण पाणी सतत रस्त्यावर येत असल्याने वाहनचालक, पादचारी आणि परिसरातील व्यापाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना या समस्येचा मोठा फटका बसत आहे. पावसाळ्याच्या तोंडावर परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली.

यावेळी आंदोलकांनी महानगरपालिका प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत तात्काळ नाल्याची साफसफाई करण्याची मागणी केली. तसेच परिसरातील अतिक्रमणे हटवून सांडपाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा, अशी मागणीही करण्यात आली. अनेक वेळा तक्रारी करूनही महानगरपालिकेकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला. आंदोलनाची माहिती मिळताच महानगरपालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी नागरिकांशी चर्चा करत परिसरातील नाल्याची साफसफाई तातडीने करण्यात येईल तसेच अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले. मात्र प्रशासनाच्या आश्वासनांवर संतप्त नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. यावेळी काही आंदोलकांनी महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना चांगलेच धारेवर धरत तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला. आंदोलनामुळे बस स्टँड ते पोलीस कॉम्प्लेक्स रोडवरील वाहतूक काही काळासाठी ठप्प झाली होती. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, ''लवकरात लवकर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आल्या नाहीत, तर यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडले जाईल,'' असा इशारा परिसरातील नागरिकांनी प्रशासनाला दिला आहे.

शहरातील वाढत्या अस्वच्छतेच्या प्रश्नामुळे महानगरपालिकेच्या कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## पान १ वरुन...

### जालना जिल्ह्यासाठी ....

निधी मंजूर करून घेतला. परतूर तालुक्यासाठी १ कोटी ९१ लाख रुपये, मंठा तालुक्यासाठी १ कोटी १४ लाख रुपये तर जालना तालुक्यासाठी १ कोटी ३७ लाख १२ हजार रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. अंबडसाठी ६३ लाख ६४ हजार, बदनापूरसाठी ४२ लाख ५० हजार ९३२, भोकरदनसाठी १३ लाख १६ हजार आणि घनसावंगीसाठी ८४ लाख ६८ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. लोणीकर यांच्या पाठपुराव्यामुळेच रखडलेली विकासकामे आणि रोजगार हमीची कामे पुन्हा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मनरेगा अंतर्गत मंजूर असलेल्या पांदण रस्त्यांच्या कामांना आयुक्त कार्यालयाकडून परस्पर स्थगिती देण्यात आल्याचा गंभीर मुद्दाही लोणीकर यांनी उपस्थित केला. मागील दोन ते तीन महिन्यांपासून राज्यातील अनेक पांदण रस्त्यांची कामे बंद असल्यामुळे हजारो मजुरांच्या रोजगारावर परिणाम झाला आहे. नव्याने व्हीबीजी-रामजी सुधारित योजना लागू होणार असल्याने आधी मंजूर असलेली कामे रद्द होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मंजूर कामे कार्यान्वित न करता ती रद्द झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ग्रामीण भागातील विकासकामांबाबत प्रशासनाची भूमिका संशयास्पद असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

रोजगार हमी विभागातील निधी वितरण प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याचे गंभीर आरोपही आमदार लोणीकर यांनी केले. जुनी व पूर्ण झालेली कामे प्रलंबित ठेवून चिरीमिरी देणाऱ्या व्यक्तींच्या कामांना प्राधान्य दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. पालघर जिल्हाधिकाऱ्यांनी ज्या कामांची शिफारसच केलेली नाही अशा कामांनाही निधी वितरित झाल्याचे लेखी नमूद केल्याची माहिती त्यांनी सभागृहात दिली. सर्व एफटीओ तयार असूनही निवडक कामांनाच निधी देण्यात येत असल्याने संपूर्ण प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांमार्फत ३ ते ५ टक्के कमिशन घेतल्याशिवाय निधी मिळत नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

राज्यातील मनरेगा आयुक्त श्री. बसतेवाड यांच्या कार्यपद्धतीवरही आमदार लोणीकर यांनी कठोर टीका केली. रायगड जिल्हा परिषदेतून थेट आयुक्त पदावर नियुक्ती झाल्यानंतर विभागात गोंधळ वाढल्याचा आरोप त्यांनी केला. मजुरांच्या मागणीच्या काळात कंत्राटी कर्मचाऱ्यांनी २२ दिवस संप केला असताना आयुक्तांनी कोणतीही ठोस भूमिका घेतली नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे श्री. बसतेवाड यांचे तात्काळ निलंबन करून उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी सरकारकडे केली. रोजगार हमी विभागातील कारभार पारदर्शक करण्यासाठी कठोर कारवाईची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

आमदार बबनराव लोणीकर यांनी रोजगार हमी योजनेंतील मजुरांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा उभारला असून राज्य सरकारला वारंवार धारेवर धरले आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करून त्यांनी लाखो मजुरांच्या हक्काच्या मजुरीचा प्रश्न राज्यभर चर्चेत आणला. ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या थकीत मजुरीसाठी सरकारला जबाबदार धरणे हीच आपली भूमिका राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. लोणीकर यांच्या आक्रमक भूमिकेमुळे रोजगार हमी विभागातील अनेक गंभीर बाबी समोर आल्या असून राज्यभरात या विषयाची मोठी चर्चा सुरू झाली आहे.

### ज्या ५८ लाख...

सातारा गॅझेटचा जीआर अद्याप काढला नाही. सरकारने कुणबीच्या ५८ लाख नोंदी सापडल्याचं सांगितलं होतं, मग त्यांना अद्याप प्रमाणपत्रं का दिली नाहीत? राज्यात ज्या ५८ लाख कुणबी नोंदी मिळाल्या आहेत त्यांची यादी द्या. त्या ५८ लाखांपैकी किती जणांना कुणबी प्रमाणपत्र दिली याची माहिती द्या.

मराठवाड्यात ज्या नोंदी सापडल्या आहेत त्यांना प्रमाणपत्र देऊ नका असे आदेश मुख्यमंत्री कार्यालयातून आले असल्याचा आरोप यावेळी मनोज जरांगे यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढे जाण्याचं कुणीचं धाडस नाही. त्यामुळे त्यांनी हैदराबाद गॅझेट लागू करा असा आदेश द्यावा, उद्या सकाळपासून कुणबी प्रमाणपत्राचं वाटप होईल असं जरांगे म्हणाले.

मनोज जरांगे यांच्याशी चर्चा करताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, ''राज्यात आतापर्यंत ३९ लाख कुणबी प्रमाणपत्र वाटप केलं, त्याची यादी देतो. सरकारचा अतिशय प्रामाणिक प्रयत्न आहे. ज्या नोंदी सापडल्या आहेत त्यांची गावनिहाय, जिल्हानिहाय माहिती देतो. आपल्या विश्वासाला तडा देऊ जाणार नाही. १९९४ मध्ये त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांनी चूक केली. मराठा समाजाला ओबीसीमध्ये घातलं नाही.

सातारा गॅझेटचा प्रस्ताव तयार झाला आहे. पण आगोदर हैदराबाद गॅझेटच्या विरोधात न्यायालयात सुनावणी सुरू आहे. त्याला स्थगिती मिळाली आहे. त्यामुळे आता लगेच सातारा गॅझेट आणलं तर त्यालाही स्थगिती मिळू शकेल अशी भीती आहे, असं राधाकृष्ण विखे पाटलांनी माहिती दिली.

नोंदी सापडलेल्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया थांबवणार नाही, हैदराबाद आणि सातारा गॅझेटची अंमलबजावणी करणार असं लेखी द्या, अशी मागणी यावेळी मनोज जरांगे यांनी केली.

### विशाल वाकडे...

आले, याचा मनापासून आनंद आणि सार्थ अभिमान वाटतो. ओ निगेटिव्ह हा युनिव्हर्सल डोनर असला तरी रक्तपेढ्यांमध्ये तो नेहमीच तुटवड्यात असतो. याची माहिती मिळताच तातडीने दवाखान्यात हजर राहून शक्य ती सेवा उपलब्ध करून दिल्याचे ते म्हणाले.

### पोस्टाद्वारे ऑनलाईन...

कॉलनी, आस्था हॉस्पिटलच्या पाठीमागे, शिवाजीनगर, भोकरदन नाका, जालना) असे असल्याचे समोर आले. त्याच्याकडून ३ हजार ५०० रुपये किमतीची एक तलवार जप्त करण्यात आली.

पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायद्यातील कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्याला सदर बाजार पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगेवाड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शिवरकर, पोहेकॉ गडधे व पोहेकॉ सोनवणे यांनी केली.

जिल्ह्यात अवैध शस्त्रांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांकडून सातत्याने विशेष मोहिमा राबविल्या जात असून अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### महापालिकेत...

आहे. महानगरपालिकेच्या सभागृहातही प्रभाग क्रमांक १६ साठी पाच नवीन घंटागाड्या व अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध करून देण्याची मागणी अमोल ठाकूर यांनी केली होती. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही.

दरम्यान, घंटागाडी सेवा तातडीने सुरळीत न केल्यास महानगरपालिकेत कचरा टाकून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नगरसेवक अमोल ठाकूर यांनी महानगरपालिका प्रशासनाला दिला आहे.

### चार महिन्यांपासून...

येथे वास्तव्यास असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तात्काळ त्या ठिकाणी रवाना झाले. पोलिसांनी परिसरात सापळा रचून आरोपी दीपक जाधव याला ताब्यात घेतले तसेच पीडित अल्पवयीन मुलीची सुटका केली.

त्यानंतर आरोपी व पीडितेला पुढील कायदेशीर कारवाईसाठी जालना येथे आणण्यात आले असून पुढील तपासासाठी चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

या कारवाईत अपर पोलीस अधीक्षक , उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ यांच्यासह पोलीस अंमलदार रमेश राठोड, प्रभाकर वाघ, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, प्रशांत लोखंडे, रेणुका बांडे, सौरभ मुळे तसेच सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार संदीप मांटे यांनी सहभाग घेतला.

अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवून नेण्याच्या घटनांकडे पोलिसांनी गांभीर्याने पाहिले असून अशा गुन्ह्यांतील आरोपींना शोधून कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही पोलिसांकडून देण्यात आला आहे.

### जालना शहरात...

पसरली असून आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

दरम्यान, शहरातील संग्राम नगर परिसरात शुक्रवारी नागरिकांचा संताप उफाळून आला. नाल्याच्या घाणीमुळे आणि सांडपाण्याच्या समस्येमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी बस स्टँड ते पोलीस कॉम्प्लेक्स रोडवर रास्ता रोको आंदोलन करत महानगरपालिका प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. आंदोलनामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. विशेष म्हणजे महिलांनीही मोठ्या संख्येने आंदोलनात सहभाग घेत प्रशासनाच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली.

आंदोलनादरम्यान नागरिकांनी नाल्यांची तात्काळ साफसफाई, अतिक्रमण हटविणे आणि शहरातील स्वच्छता व्यवस्था सुधारण्याची मागणी केली. अनेकदा तक्रारी करूनही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. आंदोलनाची दखल घेत महानगरपालिकेचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले होते. मात्र आश्वासनांपलीकडे प्रत्यक्ष काम होत नसल्याने नागरिकांमध्ये संताप कायम असल्याचे दिसून आले.

महानगरपालिकेचे स्वच्छता विभाग, स्वच्छता सभापती आणि स्वच्छता निरीक्षक शहरातील गंभीर समस्यांकडे दुर्लक्ष करत असल्याची टीका आता उघडपणे होत आहे. पावसाळ्यापूर्वी शहरातील मोठे नाले, गटारे आणि कचरा साफ करण्याची मागणी जोर धरत आहे. दरम्यान, माजी मंत्री तथा आमदार यांनी या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन मनपा प्रशासनाला धारेवर धरणार का, असा प्रश्नही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शहरातील वाढत्या अस्वच्छतेमुळे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता व्यक्त होत असून प्रशासनाने तातडीने व्यापक स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी शहरवासीयांकडून होत आहे.

### विभागीय आयुक्तांनी...

नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचे चित्र आहे. नागरिकांच्या मते, महानगरपालिकेचा स्वच्छता विभाग आणि संबंधित अधिकारी वारंवार तक्रारी करूनही प्रभावी कारवाई करत नसल्याने परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. शहरात कचऱ्याचे ढीग, तुंबलेली गटारे आणि दुर्गंधीमुळे डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो यांसारख्या आजारांचा धोका वाढला असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

यामुळे आता विभागीय आयुक्त यांनी स्वतः हस्तक्षेप करून महानगरपालिका प्रशासनाची तातडीची बैठक घ्यावी, स्वच्छता विभागाला कडक सूचना द्याव्यात आणि पावसाळ्यापूर्वी शहरातील नालेसफाई व स्वच्छता मोहीम युद्धपातळीवर राबवावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. ''नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांचे विभागीय आयुक्त यांनी कान टोचणे गरजेचे आहे,'' अशी तीव्र प्रतिक्रिया अनेक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# उत्पन्नाचे नियमित स्त्रोत नाही, हे कारण पत्नी व मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी टाळण्यासाठी पुरेसे नाही

जालना - प्रतिनिधी

पतीकडे उत्पन्नाचा कोणताही नियमित स्रोत नाही, या एकमेव कारणास्तव तो आपली पत्नी आणि मुलांच्या पालनपोषणाच्या कायदेशीर आणि नैतिक जबाबदारीतून मुक्त होऊ शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल दिल्ली उच्च न्यायालयाने दिला आहे. कौटुंबिक न्यायालयाने पत्नी व दोन मुलींना प्रत्येकी ११,००० रुपये मासिक देखभाल खर्च देण्याचा दिलेला आदेश पतीच्या आव्हान याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती सौरभ बॅनर्जी यांनी हे निरीक्षण नोंदवले आणि पतीची याचिका फेटाळून लावली. या प्रकरणात, पतीने कौटुंबिक न्यायालयाच्या ऑक्टोबर २०२४ च्या निर्णयाला आव्हान दिले होते. आपण कंत्राटी पद्धतीने काम करत असून स्थिर उत्पन्न नसल्याचे त्याचे म्हणणे होते. यासोबतच, क्षयरोग, मधुमेह आणि हृदयविकारासारख्या विविध आजारांनी ग्रस्त असल्याचेही त्याने याचिकेत नमूद केले होते. आपल्यावर वृद्ध आईची जबाबदारी असून थकीत कर्जाचा बोजाही असल्याचे त्याने न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला.

पतीने पुढे असा युक्तिवाद केला की, त्याची पत्नी वाणिज्य शाखेची पदवीधर असून ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे. तिने यापूर्वी एका खाजगी कंपनीत काम केले होते, परंतु ही माहिती तिने आपल्या उत्पन्न प्रतिज्ञापत्रात हेतुपुरस्सर लपवली, असा दावाही त्याने केला होता. या सर्व कारणास्तव कौटुंबिक न्यायालयाने दिलेला देखभाल खर्चाचा आदेश रद्द करावा, अशी विनंती त्याने न्यायालयाकडे केली होती. पत्नीच्या वतीने या याचिकेला तीव्र विरोध करण्यात आला. पती आजारपण, आर्थिक संकट आणि इतर दायित्वांबाबत जे दावे करत आहे, ते त्याने यापूर्वी कौटुंबिक न्यायालयासमोर कधीही मांडले नाहीत. त्यामुळे पुनरीक्षण याचिकेच्या टप्प्यावर पहिल्यांदाच असे मुद्दे उपस्थित केले जाऊ शकत नाहीत, असा युक्तिवाद पत्नीच्या वकिलांनी केला. न्यायालयाच्या मर्यादित पुनरीक्षण अधिकारक्षेत्रात हस्तक्षेप करण्यास कोणताही वाव नसल्याचेही त्यांनी सांगितले.

उच्च न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर स्पष्ट केले की, पुनरीक्षण अधिकारक्षेत्रात ( ) हस्तक्षेपाची व्याप्ती अत्यंत मर्यादित आहे. कौटुंबिक न्यायालयाच्या निर्णयात कोणतीही विकृती किंवा बेकायदेशीरता असल्याचे दाखवण्यात पती पूर्णपणे अपयशी ठरला आहे. पत्नी स्वतः आणि दोन मुलींचे पालनपोषण करण्यासाठी आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे, हे सिद्ध करणारा कोणताही ठोस पुरावा पती सादर करू शकला नाही, असे न्यायालयाने नमूद केले.

या निकालावर भाष्य करताना जालना येथील नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष, ॲड. महेश धन्नावत म्हणाले, ''दिल्ली उच्च न्यायालयाचा हा निकाल सामाजिक न्याय आणि कौटुंबिक जबाबदारीच्या तत्त्वाला बळकटी देणारा आहे. अनेक प्रकरणांमध्ये, पती उत्पन्नाचे अस्थिर स्वरूप किंवा इतर कारणे पुढे करून देखभाल खर्चाची जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करतात. तथापि, हा निकाल स्पष्ट करतो की, कायदा अशा प्रकारच्या युक्तिवादांना स्वीकारत नाही. पतीची केवळ सध्याची मिळकत नव्हे, तर त्याची एकूण मिळकत क्षमता, शिक्षण आणि पूर्वीचे उत्पन्न या बाबींचाही विचार केला जातो. पत्नी आणि मुलाबाळांना सन्मानाने जगण्याचा हक्क असून, पती शारीरिक श्रम करूनही ही जबाबदारी पार पाडू शकतो, या सर्वोच्च न्यायालयाच्या सिद्धांताला या निकालाने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.

न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या भुवन मोहन सिंग विरुद्ध मीना (२०१५) आणि अंजू गर्ग विरुद्ध दीपक कुमार गर्ग (२०२२) या प्रकरणांचा संदर्भ दिला. या निकालांनुसार, पती आपल्या पत्नी आणि मुलांची देखभाल करण्याच्या जबाबदारीतून पळ काढू शकत नाही; पत्नी व अल्पवयीन मुलांना आर्थिक सहाय्य देणे हे पतीचे पवित्र कर्तव्य आहे, मग त्यासाठी त्याला शारीरिक कष्ट करावे लागले तरी चालतील. पतीच्या स्वतःच्या कागदपत्रांवरून तो तांत्रिकदृष्ट्या कुशल असल्याचे आणि पूर्वी भरीव पगार मिळवत असल्याचे दिसून आले. २०२१ दरम्यान त्याला दरमहा सुमारे ४०,००० रुपये पगार मिळत होता आणि त्याच्या बँक खात्यात वारंवार मोठ्या रकमा जमा झाल्या होत्या, ज्यात जवळपास ६०,००० रुपयांची एक मोठी रक्कमही समाविष्ट होती. या सर्व बाबी विचारात घेऊन न्यायालयाने पतीची याचिका फेटाळून लावली आणि कौटुंबिक न्यायालयाचा आदेश कायम ठेवला.

## महसुल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे; विविध प्रकल्पास भेट व कार्यालयांची पाहणी

जालना -प्रतिनिधी

: ज्याचे अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे हे आज (दि. २९ मे) जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता, त्यांनी आज विविध विकास प्रकल्प आणि शासकीय कार्यालयास प्रत्यक्ष भेट देवून कामांची पाहणी केली. अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे यांच्या दौऱ्याची सुरुवात दरेगाव (ता. जालना) येथील ड्रायपोर्ट प्रकल्पाच्या पाहणीने झाली. या प्रकल्पाची सद्यस्थिती, उपलब्ध सुविधा तसेच भविष्यातील नियोजनाबाबत त्यांनी अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. प्रकल्पाच्या कामांमध्ये गती आणण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. त्यानंतर त्यांनी जालना शहरातील मोतीबाग चौपाटी येथे सुरू असलेल्या सुशोभिकरण कामांची पाहणी केली. कामाची गुणवत्ता, प्रगती आणि नागरिकांसाठी निर्माण करण्यात येणाऱ्या सुविधांचा त्यांनी आढावा घेतला. शहर सौंदर्यीकरणाच्या कामांमध्ये दर्जा राखण्याबाबत त्यांनी संबंधित यंत्रणेला सूचना केल्या. यानंतर जालना येथील सिरसवाडी रोडवरील जिल्हा रेशीम कोष बाजारपेठेस भेट देऊन बाजारपेठेतील सुविधा आणि कार्यपद्धतीची माहिती घेतली. तसेच यावेळी त्यांनी उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, सह दुय्यम निबंधक कार्यालयास, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना, तहसिल कार्यालय, जालना, आपले सरकार सेवा केंद्र तहसिल कार्यालय, जालना येथे भेट देऊन येथील उपलब्ध सोयी सुविधांची पाहणी केली. तसेच संबंधीत कर्मचाऱ्यांशी संवाद साधुन नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवांची देखील माहिती घेतली. तसेच त्यांनी बदनापुर येथील कृषी विज्ञान/संशोधन केंद्रास भेट दिली. कार्यालयीन कामकाज अधिक गतिमान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या सूचना नी अधिकाऱ्यांना दिल्या.

## युनायटेड ग्लोबल फेडरेशन ऑफ इंडियाच्या स्वयंसेवकाने रेस्क्यू ऑपरेशन करून जखमी वानरास दवाखान्यात नेले

दत्ता देशमुख

देऊळगाव . येथील पोलीस स्टेशन परिसरात मागील तीन दिवसांपासून एक जखमी वानर वावरत असल्याचे निदर्शनास आले होते. विजेचा शॉक लागल्यामुळे त्या वानराच्या एका हाताला गंभीर दुखापत झाली होती. जखमी अवस्थेमुळे ते वानर परिसरात इकडून तिकडे भटकत होते. वानराची अवस्था लक्षात घेऊन पोलीस कर्मचाऱ्यांनी वन विभागाशी संपर्क साधला. त्यानंतर वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडियाचे वन्यजीव रक्षक वैभव लाखोले यांना माहिती दिली. माहिती मिळताच वैभव लाखोले यांनी कोणताही विलंब न करता देऊळगाव राजा पोलीस स्टेशन परिसरात धाव घेतली. यावेळी वन विभागाचे कर्मचारीही उपस्थित होते. सुरुवातीला वानराला पकडण्याचा प्रयत्न अयशस्वी



ठरला. मात्र, जखमी असूनही ते वानर अत्यंत चपळाईने हालचाल करत असल्याने रेस्क्यू मोहिमेत अडचणी निर्माण झाल्या. अखेर वन्यजीव रक्षक वैभव लाखोले यांनी धाडस व कौशल्य दाखवत त्या वानराला सुरक्षितपणे पकडण्यात यश मिळवले.

त्यानंतर जखमी वानराला तातडीने जवळील पशुवैद्यकीय दवाखान्यात नेऊन आवश्यक उपचार करण्यात आले. वानराची प्रकृती पूर्णपणे सुधारत नाही तोपर्यंत त्याला वन विभागाच्या देखरेखीखाली ठेवण्यात यावे व प्रकृती स्थिर झाल्यानंतरच त्याला नैसर्गिक अधिवासात सोडण्यात यावे, अशी मागणी युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडियाचे वन्यजीव रक्षक वैभव लाखोले यांनी केली.

दि. २८ मे रोजी पार पडलेल्या या यशस्वी रेस्क्यू मोहिमेमुळे जखमी वन्यजीवाला वेळेत मदत मिळाली असून वन विभाग, पोलीस प्रशासन आणि युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडिया यांच्या समन्वयाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## गोरक्ष थोरात पाटील यांचे निधन



जालना (प्रतिनिधी) : महिको कंपनीच्या उत्पादन विभागाचे सेवानिवृत्त मॅनेजर गोरक्ष पाटील थोरात (महिको कॉलनी) यांचे आज दिनांक २८ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले,एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार होता. त्यांच्या पार्थिवावर आज शुक्रवारी दुपारी १ वाजता अमरधाम (शेरी) येथे होणार आहे.

## जालन्यात अवैध दारुविक्रीवर पोलिसांचा छापा; हॉटेल देवांशमधून ३१ हजारांचा मुद्देमाल जप्त

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या अवैध दारुविक्रीविरोधात उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या पथकाने मोठी कारवाई करत हॉटेल देवांश येथे छापा मारून देशी व विदेशी दारूचा सुमारे ३१ हजार ४३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून शहरात अवैध धंद्यांविरोधातील पोलिसांची मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आज दिनांक २९ मे २०२६ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांनी जालना उपविभागातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्याचे आदेश विशेष पथकाला दिले होते. त्यानुसार सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुप्त माहितीच्या आधारे शोधमोहीम राबविण्यात आली.



दरम्यान, नविन मोंढा गेटसमोरील हॉटेल देवांश येथे बेकायदेशीररीत्या देशी व विदेशी दारूची विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ छापा टाकला असता आरोपी विजय सोमीनाथ भालेराव (रा. द्वारकानगर, जालना) हा विनापरवाना दारू विक्री करताना आढळून आला. पोलिसांनी त्याच्या ताब्यातून देशी व विदेशी दारूचा एकूण ३१ हजार ४३० रुपयांचा माल जप्त केला. या प्रकरणी आरोपी विजय सोमीनाथ भालेराव तसेच हॉटेल देवांशचे मालक प्रविण बबनराव शिंदे (रा. द्वारकानगर, जालना) यांच्या विरोधात सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस नाईक दादासाहेब चव्हाण (नेमणूक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, जालना) यांच्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघवीरसिंग संधु, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत वाचक पोउपनि हरिश राठोड, पोना/१४४० दादासाहेब चव्हाण, पोकॉ/५५० नितीन झोटे, पोकॉ/१४३८ परमेश्वर धुमाळ आणि पोकॉ/१४५१ कैलास बहुरे यांनी सहभाग घेतला.शहरात सुरू असलेल्या अवैध दारुविक्री, जुगार, सट्टा व इतर बेकायदेशीर धंद्यांविरोधात पोलिसांकडून सातत्याने कारवाया सुरू असून आगामी काळातही ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## ''सिपेट'' अभ्यासक्रमासाठी ऑनलाइन प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ मे

छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी

केंद्रीय पेट्रोरसायन अभियांत्रिकी व प्रौद्योगिकी संस्थान छत्रपती संभाजीनगर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विविध प्लास्टिक्स अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ मे २०२६ आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे निदेशक व प्रमुख ए. के. राव यांनी केले आहे.

दरवर्षी ऑल इंडिया स्तरावर घेतल्या जाणाऱ्या च्या माध्यमातून गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. यावर्षी प्रवेश परीक्षा ७ जून २०२६ रोजी होणार असून परीक्षेसाठी नोंदणी २६.. येथे सुरू आहे. सिपेट, छत्रपती संभाजीनगर येथे दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी डिप्लोमा इन प्लास्टिक टेक्नॉलॉजी () आणि डिप्लोमा इन प्लास्टिक मोल्ड टेक्नॉलॉजी () हे तीन वर्षांचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. तसेच बी.एससी. उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन प्लास्टिक प्रोसेसिंग अँड टेस्टिंग (-) हा दोन वर्षांचा अभ्यासक्रम सुरू आहे. अभियांत्रिकी डिप्लोमा पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी पोस्ट डिप्लोमा इन प्लास्टिक मोल्ड डिझाइन (-) हा १८ महिन्यांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. केंद्रीय पेट्रोरसायन अभियांत्रिकी व प्रौद्योगिकी संस्थान () ही संस्था महाराष्ट्रातील प्लास्टिक्स उद्योगांना तांत्रिक सहाय्य, कुशल मनुष्यबळ निर्मिती तसेच संशोधन व विकासकार्याला चालना देण्याच्या उद्देशाने २००६ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे स्थापन करण्यात आली.

संस्थेला ९००१:२०१५ मानांकन प्राप्त असून येथे मान्यताप्राप्त व समतुल्य प्लास्टिक्स अभियांत्रिकी अभ्यासक्रम राबविले जातात. संस्थेत जागतिक दर्जाचे कॅड/कॅम, टूल रूम, प्लास्टिक प्रोसेसिंग आणि प्लास्टिक टेस्टिंग विभाग कार्यरत असून आधुनिक यंत्रसामग्रीच्या साहाय्याने उद्योगांना तांत्रिक सहाय्य तसेच विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक आधारित प्रशिक्षण दिले जाते. रोजगार व स्वयंरोजगार लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होत असल्याचे संस्थेकडून सांगण्यात आले.

अधिक माहितीसाठी ९३०३६८७९१५ किंवा ०२४०-२४७८३२२ या दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अर्बन नक्षलवाद : राष्ट्रीय सुरक्षेसमोरील एक गंभीर आव्हान - डॉ. भारत कऱ्हाड

## राष्ट्रीय सुरक्षा, लोकशाही स्वातंत्र्य आणि सामाजिक जबाबदारी यांच्यातील संतुलनाचा शोध

भारतासारख्या विशाल, लोकशाहीवादी आणि विविधतेने नटलेल्या देशात राष्ट्रीय सुरक्षा ही केवळ सीमांवरील लष्करी आव्हानांपुरती मर्यादित नसते. देशाच्या अंतर्गत स्थैर्याला बाधा आणणाऱ्या विविध प्रवृत्ती, विचारसरणी आणि संघटनात्मक हालचाली यांचाही त्यात समावेश होतो. गेल्या काही वर्षांत ''अर्बन नक्षलवाद'' हा शब्द राजकीय, सामाजिक आणि सुरक्षा विषयक चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. काहींच्या मते तो देशाच्या अंतर्गत सुरक्षेसमोरील गंभीर धोका आहे, तर काहींच्या मते हा शब्द अनेकदा अतिवापरला जातो. त्यामुळे या विषयाचा वस्तुनिष्ठपणे विचार करणे आवश्यक आहे. भारतातील नक्षलवादी चळवळीचा इतिहास १९६७ मधील नक्षलबाडी आंदोलनापासून सुरू होतो. जमीन, सामाजिक विषमता आणि सत्ताकेंद्राविरोधातील संघर्षातून ही चळवळ उदयास आली. कालांतराने ती सशस्त्र संघर्षाच्या मार्गाने पुढे गेली आणि देशातील अनेक जंगलप्रधान भागांमध्ये तिचा प्रभाव वाढला. केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी नक्षलवादाला देशाच्या अंतर्गत सुरक्षेसमोरील सर्वात मोठ्या आव्हानांपैकी एक मानले आहे. मात्र, नक्षलवाद केवळ जंगलांमध्ये बंदूक हातात घेऊन लढणाऱ्या कार्यकर्त्यांपुरता मर्यादित नसून त्याला वैचारिक, आर्थिक, तांत्रिक आणि संघटनात्मक पाठबळ देणारी यंत्रणाही असू शकते, असा सुरक्षा यंत्रणांचा दावा असतो. याच पार्श्वभूमीवर ''अर्बन नक्षलवाद'' ही संकल्पना पुढे आली.

अर्बन नक्षलवाद म्हणजे शहरांमध्ये राहून नक्षलवादी विचारसरणीचा प्रचार, प्रसार किंवा अप्रत्यक्ष पाठिंबा देण्याच्या कथित प्रयत्नांना संबोधण्यासाठी वापरला जाणारा शब्द. सुरक्षा तज्ज्ञांच्या मते, कोणतीही दीर्घकालीन सशस्त्र चळवळ केवळ ग्रामीण किंवा जंगल भागांवर अवलंबून राहू शकत नाही. तिला शहरांमधील संपर्कजाळे, बौद्धिक समर्थन, आर्थिक मदत, प्रचार यंत्रणा आणि नव्या कार्यकर्त्यांची आवश्यकता असते. त्यामुळे काही व्यक्ती किंवा गट शहरांमध्ये राहून अशा संघटनांच्या उद्दिष्टांना पूरक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करतात, असा आरोप वेळोवेळी केला जातो.

अर्बन नक्षलवादाची चर्चा होताना सोशल मिडिया, विद्यार्थी संघटना, विविध आंदोलने, काही स्वयंसेवी संस्था, लेखक, विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्ते यांचाही उल्लेख केला जातो. तथापि, येथे एक महत्त्वाची बाब लक्षात घ्यावी लागते. लोकशाहीमध्ये सरकारवर टीका करणे, आंदोलन करणे, अन्यायाविरुद्ध आवाज



उठवणे किंवा पर्यायी विचार मांडणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे. त्यामुळे सरकारविरोधी मत व्यक्त करणे आणि नक्षलवादी विचारसरणीला समर्थन देणे या दोन भिन्न गोष्टी आहेत. यातील सीमारेषा ओळखणे अत्यंत आवश्यक आहे. याच कारणामुळे अर्बन नक्षलवाद हा विषय वादग्रस्त ठरतो. सुरक्षा यंत्रणांचे म्हणणे आहे की काही घटक लोकशाही, मानवाधिकार किंवा सामाजिक न्याय यांच्या नावाखाली प्रत्यक्षात हिंसक आणि संविधानविरोधी विचारांना पोषक वातावरण निर्माण करतात. दुसरीकडे अनेक सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि अभ्यासक असा युक्तिवाद करतात की ''अर्बन नक्षल'' हा शब्द कधी कधी राजकीय विरोधकांना किंवा असहमती व्यक्त करणाऱ्यांना लक्ष्य करण्यासाठी वापरला जातो. त्यामुळे या विषयावर चर्चा करताना भावनांपेक्षा तथ्यांना अधिक महत्त्व देणे आवश्यक आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने पाहिले तर कोणतीही संघटना किंवा व्यक्ती जर हिंसक कारवायांना मदत करत असेल, युवकांना हिंसेकडे प्रवृत्त करत असेल किंवा देशाच्या घटनात्मक व्यवस्थेविरोधात सशस्त्र संघर्षासाठी प्रेरित करत असेल, तर ती गंभीर चिंतेची बाब ठरते. अशा प्रकारच्या हालचालींचा शोध घेणे आणि त्यांच्यावर कारवाई करणे हे सुरक्षा यंत्रणांचे कर्तव्य आहे. आधुनिक काळात ही आव्हाने अधिक गुंतागुंतीची झाली आहेत. कारण आजचा संघर्ष केवळ जंगलात किंवा दुर्गम भागात मर्यादित नसून तो इंटरनेट, सोशल मीडिया, डिजिटल नेटवर्क आणि माहितीच्या माध्यमातूनही लढला जातो.

विशेषतः तरुण पिढीवर सोशल मीडियाचा वाढता प्रभाव लक्षात घेता, कोणत्याही प्रकारचा प्रचार वेगाने पसरू शकतो. काही तासांत लाखो लोकांपर्यंत एखादा संदेश पोहोचू शकतो. त्यामुळे डिजिटल माध्यमांचा वापर करून असंतोष वाढवणे, संस्थांवरील विश्वास कमी करणे किंवा समाजात ध्रुवीकरण निर्माण करणे शक्य होते. म्हणूनच सुरक्षा यंत्रणा अशा मोहिमांवर लक्ष ठेवतात. मात्र, याचबरोबर अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे रक्षण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

भारतीय राज्यघटनेने नागरिकांना विचारस्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य आणि शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार दिला आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीवर केवळ तिच्या मतांमुळे कारवाई करता येत नाही. कायद्याच्या चौकटीत राहून पुरावे, तपास आणि न्यायालयीन प्रक्रिया यांच्या आधारेच दोष निश्चित केला जाऊ शकतो. म्हणूनच अर्बन नक्षलवादाच्या आरोपांकडे पाहताना संयम आणि वस्तुनिष्ठता आवश्यक असते.

अर्बन नक्षलवादाच्या संदर्भात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे युवकांचे मार्गदर्शन. देशातील तरुणाई ही राष्ट्राची सर्वात मोठी शक्ती आहे. त्यांची ऊर्जा, सर्जनशीलता आणि बदल घडवून आणण्याची क्षमता अमूल्य आहे. परंतु हीच ऊर्जा चुकीच्या दिशेने वळवली गेल्यास सामाजिक अस्थिरता निर्माण होऊ शकते. त्यामुळे शिक्षणसंस्था, कुटुंबव्यवस्था, सामाजिक संस्था आणि शासन यांनी युवकांमध्ये संविधाननिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन, लोकशाही मूल्ये आणि राष्ट्रहिताची जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न केवळ पोलिस, सैन्य किंवा गुप्तचर यंत्रणांपुरता मर्यादित नसतो. तो संपूर्ण समाजाशी संबंधित असतो. समाजात न्याय, समान संधी, पारदर्शक प्रशासन आणि विकासाची फळे सर्वांपर्यंत पोहोचल्यास अतिरेकी विचारसरणींना पोषक वातावरण कमी मिळते. त्यामुळे सुरक्षा उपाययोजनांसोबत सामाजिक आणि आर्थिक विकासालाही तितकेच महत्त्व द्यावे लागते.एकूणच, अर्बन नक्षलवाद हा विषय केवळ सुरक्षा किंवा राजकारणाच्या चौकटीत मर्यादित ठेवता येणार नाही. तो राष्ट्रीय सुरक्षा, लोकशाही, सामाजिक न्याय, युवकांची भूमिका आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य या सर्व घटकांशी संबंधित आहे. कोणताही निष्कर्ष काढताना पुरावे, कायदा आणि संविधानिक मूल्ये यांना सर्वोच्च स्थान दिले पाहिजे. राष्ट्रीय सुरक्षेचे रक्षण करणे जितके आवश्यक आहे, तितकेच लोकशाही स्वातंत्र्यांचे संरक्षण करणेही आवश्यक आहे. या दोन्ही मूल्यांमध्ये योग्य संतुलन राखणे हेच भारतासारख्या प्रगल्भ लोकशाहीसमोरील सर्वात मोठे आणि सततचे आव्हान आहे.

**डॉ. भारत दगडोबा कऱ्हाड**
**सामाजिक व राजकीय विश्लेषक, पुणे.**

# जालना महानगरपालिकेच्या ढासळलेल्या कारभारावर शिवसेनेचा संताप

## आढावा बैठकीची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेतील ढासळलेल्या कारभारावरून शिवसेनेने प्रशासनासह सत्ताधारी भाजपवर जोरदार निशाणा साधला असून शहरातील मूलभूत समस्यांबाबत तातडीने नियोजन व आढावा बैठक घेण्याची मागणी केली आहे. विरोधी पक्षनेते कमलेश खरे यांनी महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देत शहरातील गंभीर समस्यांकडे लक्ष वेधले आहे. तसेच, प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास शिवसेना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही देण्यात आला आहे.

शिवसेना विरोधी पक्षनेते कमलेश खरे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या काही महिन्यांपासून जालना महानगरपालिकेचा कारभार पूर्णतः कोलमडला असून नागरिकांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. सत्ताधारी भाजपमधील अंतर्गत गटबाजी, प्रशासनातील समन्वयाचा अभाव आणि दिशाहीन नियोजनामुळे शहरातील परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे.



निवेदनात शहरातील अनेक भागांमध्ये अनियमित पाणीपुरवठ्याचा प्रश्न गंभीर झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. अनेक नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून प्रशासनाकडून कोणतेही ठोस नियोजन केले जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, वारंवार खंडित होणाऱ्या विद्युत पुरवठ्यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

याशिवाय शहरातील मुख्य रस्ते तसेच गल्लीबोळांमध्ये मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग साचल्याने स्वच्छतेचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. नियमित साफसफाई होत नसल्याने नागरिकांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण होत असल्याची भावना शहरवासीयांमध्ये असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचाही गंभीर आरोप शिवसेनेकडून करण्यात आला आहे. अनेक विकासकामे केवळ कागदोपत्री दाखवून बोगस नोंदी केल्या जात असल्याचा संशय नागरिक व्यक्त करत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. जनतेच्या कराच्या पैशावर चालणारी महानगरपालिका नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असल्याचे दुर्दैवी चित्र सध्या शहरात पाहायला मिळत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर माजी मंत्री तथा आमदार हे लवकरच महानगरपालिका आयुक्त व सर्व विभागप्रमुखांसोबत स्वतंत्र नियोजन आढावा बैठक घेणार असल्याची माहितीही निवेदनातून देण्यात आली आहे. या बैठकीत शहरातील मूलभूत सुविधांबाबत आवश्यक सूचना व आदेश देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. शिवसेनेची भूमिका स्पष्ट करताना विरोधी पक्षनेते कमलेश खरे यांनी ''राजकारणापेक्षा शहराचा विकास आणि नागरिकांच्या सुविधा यांना प्राधान्य मिळाले पाहिजे,'' असे म्हटले आहे. प्रशासनाने तात्काळ कारभार सुधारला नाही, तर शिवसेना जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला. ''शहरवासीयांची सोय हेच आमचे प्राधान्य,'' असे सांगत प्रशासनाने तातडीने योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांची जयंती साजरी



**जालना -प्रतिनिधी**

प्रखर देशभक्त, विज्ञानवादी विचारवंत,भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात स्वबलिदानाने, साहित्य संपदेंने आणि चैतन्यमयी नेतृत्वाने शेकडो तनमनांना स्फूर्ती देणाऱ्या स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांची जयंती जालना येथील ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय येथे (दि. २८) रोजी साजरी करण्यात आली.

प्रारंभी ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालयाचे जेष्ठ वाचक पांडुरंग काळे व बद्रीप्रसाद सोनी यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी तर उपस्थितांचे आभार शैलेंद्र बदनापुरकर यांनी केले. अरुण जोशी, राजेंद्र चौधरी,सोपानराव सरनाईक,विजय खिल्लारे, अभिजित शेंडगे यासह वाचकवर्ग उपस्थित होता.

# लातूरच्या युनिव्हर्सल कराटे अकॅडमीचे १० खेळाडू भारतीय संघात

## नेपाळमधील आंतरराष्ट्रीय स्पर्धेत घेणार सहभाग

**जालना -प्रतिनिधी**

लातूरच्या युनिव्हर्सल कराटे मार्शल आर्ट अकॅडमीच्या १० विद्यार्थ्यांची १७ व्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. काठमांडू येथे २ ते ४ जून २०२६ दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत ते देशाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

राष्ट्रीय खेल कुद परिषद त्रिपुलेश्वर, काठमांडू आणि नेपाळ शोतोकान कराटे असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा दशरथ स्टेडियम, रंगशाळा, काठमांडू येथे आयोजित केली आहे. स्पर्धेत भारतासह नेपाळ, बांगलादेश, पाकिस्तान, मलेशिया, भूतान आदी देशांचे खेळाडू सहभागी होणार आहेत. मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण सरावाच्या बळावर या विद्यार्थ्यांनी भारतीय संघात स्थान मिळवले आहे. निवड झालेल्या खेळाडूंमध्ये प्रग्यान संतोष बजाज, शिवांश शशिकांत कनडे, अर्जुन अशोक बारबोले, यशदीप तुकाराम बांडे, समिहन हरीसर्वोत्तम जोशी, यश शिवाजी कोंडमगिरे, आर्फत इमरान शेख, चैतन्य ज्ञानोबा मुंडे, शिवम वाल्मीक सोमवंशी



आणि सम्राट राजाभाऊ सूर्यवंशी यांचा समावेश आहे.निवड झाल्याबद्दल भाजप नेत्या श्रीमती अर्चना ताई पाटील चाकूरकर आणि भाजप युवा नेते श्री दिग्विजय भैया काथवटे यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.ङ्गङ्गया यशाचे श्रेय संस्थापक अध्यक्ष शिहाण तुषार रमेशप्रसाद अवस्थी तसेच सहप्रशिक्षिका सेन्साई प्रसाद माळी, सेन्साई गौरव कोरे, सेन्साई करण पवार आणि सेन्साई आदित्य जगदाळे यांच्या मार्गदर्शनाला जाते, असे अकॅडमीतर्फे सांगण्यात आले.

या निवडीमुळे महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, लातूरच्या क्रीडा क्षेत्रासाठी ही अभिमानाची बाब आहे.

# जाफ्राबाद येथे बकरी ईद उत्साहात साजरी; ईदगाह परिसरात शेकडो भाविकांची उपस्थिती

**दत्ता देशमुख**



जाफ्राबाद शहरासह तालुक्यात बकरी ईदचा पवित्र सण मोठ्या उत्साहात, धार्मिक वातावरणात आणि बंधुभावाने साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच मुस्लिम बांधवांनी ईदगाह तसेच विविध मशिदींमध्ये नमाज अदा करून देशात सुख, शांतता आणि ऐक्य नांदावे यासाठी प्रार्थना केली.

जाफ्राबाद येथील ईदगाह परिसरात शेकडोच्या संख्येने भाविक दाखल झाले होते. पारंपरिक वेशभूषेत आलेल्या नागरिकांनी एकमेकांना आलिंगन देत ईदच्या शुभेच्छा दिल्या. लहान मुलांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला.

सणानिमित्त शहरातील बाजारपेठांमध्ये दिवसभर गर्दीचे वातावरण होते. नागरिकांनी खरेदीसाठी मोठी उपस्थिती लावली होती. अनेक ठिकाणी समाजबांधवांनी एकत्र येत सामाजिक ऐक्य आणि बंधुभावाचे दर्शन घडविले.

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी जाफ्राबाद पोलीस प्रशासनाने चोख सुरक्षा व्यवस्था ठेवली होती. ईदगाह परिसर, प्रमुख चौक, मशिदी आणि गर्दीच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी पोलीस निरीक्षक सतीश जाधव, पोलीस उपनिरीक्षक देव पवार, पोलीस उपनिरीक्षक राजधर पठाडे, महेश वैद्य, पी.सी. जायभाय, पी.सी. दूरे, डोईफोडे व इतर पोलीस कर्मचारी सतत गस्त घालत परिस्थितीवर लक्ष ठेवून होते.

पोलीस प्रशासनाच्या सतर्कतेमुळे तसेच नागरिकांच्या सहकार्यामुळे बकरी ईदचा सण शांततेत, आनंदी वातावरणात आणि उत्साहात पार पडला.

# गतीमान प्रशासनासाठी ई-ऑफिस प्रणालीसह आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा- अपर मुख्य सचिव विकास खारगे

**जालना -प्रतिनिधी**

महसूल विभाग हा समाजासाठी काम करणारा महत्त्वाचा घटक असल्याने अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी ओळखुन काम करत, गतिमान प्रशासनासाठी ई-ऑफिस प्रणाली आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा असे आवाहन महसुल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी केले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित महसुल विभागाच्या आढावा बैठकीत श्री. खारगे बोलत होते. यावेळी बैठकीस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी मनिषा देशपांडे, सुकेशिनी पगारे, सह जिल्हा निबंधक रामेश्वर रोडगे, जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख एम. पी. मगर, तहसिलदार छाया पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अपर मुख्य सचिव श्री. खारगे पुढे म्हणाले की, नागरीकांना पारदर्शकपणे सेवा देण्यासाठी तसेच शासकीय कामकाजात गती आणुन कामाकाजातील प्रलंबितता कमी करण्यासाठी सर्व महसुल यंत्रणांनी ई-ऑफिस प्रणालीचा वापर करणे आवश्यक आहे. शासनने ईज ऑफ डुइंग बिझनेसचे धोरण स्विकारले आहे. तसेच महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी आठवड्यातून एक दिवस क्षेत्रीय दौरा करावा. यामुळे नागरिकांचे प्रश्न समजावून घेण्यास मदत होते. तसेच त्यांनी दिलेल्या निवेदनांवर सकारात्मक कारवाई करावी. तसेच विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करुन, गुणवत्ता जाणून घेण्यास मदत होते. प्रशासनाने नागरिकामध्ये जावून काम करण्याचा प्रयत्न करावा. नागरिकांच्या समस्या, तक्रारींचा निपटारा करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करुन त्यांच्या तक्रारींचा पाठपुरावा घ्यावा. कोणताही पाणंद रस्ता घेण्यापूर्वी तो अतिक्रमणमुक्त असावा, तसेच भूमी अभिलेख कार्यालयाकडून त्याचे सीमांकन करुन घ्यावे. पाणंद रस्त्यांच्या दर्जेदार कामांवर लक्ष ठेवण्याचे आणि पावसाळ्यापूर्वी जास्तीत-जास्त रस्ते पूर्ण करण्याचे नियोजन करावे. तसेच शासकीय जमिनी अतिक्रमण विरहित कशा राहतील तसेच त्यांचे व्यवस्थापन कसे करता येईल याचे नियोजन करावे. शासकीय आणि खाजगी जागेची जबाबदारी महसुल विभागाकडे आहे. याकरीता सर्व सातबारा आणि मिळकत पत्रिका व्यवस्थित सुरक्षित ठेवाव्यात. तसेच नागरिकांना अनावश्यक त्रास होऊ नये, यासाठी सर्व अर्जांची वेळेत व पारदर्शक पद्धतीने पूर्तता करण्याचे आवाहन केले.

यावेळी अपर मुख्य सचिव श्री. खारगे यांनी त्यांनी जनगणना, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान, शासकीय जमिनी वाटप व शर्तभंग प्रकरणे,पर्यायी वनीकरण,वन जमिनीचे ७/१२ अद्ययावत करणे, सिलिंग जमिन प्रकरणे, शेत व पाणंद रस्ते योजना, ई-पीक पाहणी, फेरफार नोंदी, वनहक्क दावे, अवैध गौण खनिज, घरकुलांना वाळू उपलब्ध करुन देणे आदी विषयांसह महसूल विषयक इतर कामांचाही आढावा घेतला. तसेच महसूल विभागातील प्रलंबित कामे, नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा तसेच प्रशासकीय कामकाज अधिक कार्यक्षम करण्याच्या सूचना दिल्या.

निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी सादरीकरणांद्वारे महसुल विभागातील विविध विषयांचा सविस्तर माहिती सादर केली. यावेळी बैठकीस जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, उपअधिक्षक भूमि अभिलेख, सह दूय्यम निबंधक यांची ऑनलाईन उपस्थिती होती.

# पाटोदा येथे विठ्ठल मंदिराच्या जागेवरील अतिक्रमण हटविण्याची ग्रामस्थांची मागणी

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर तालुक्यातील मौजे पाटोदा (माव) येथील ग्रामपंचायत हद्दीतील विठ्ठल मंदिराच्या जागेवर काही गावगुंडांकडून अनाधिकृत अतिक्रमण करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याबाबत गावकरी मंडळींनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती परतूर यांना निवेदन देऊन तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

निवेदनानुसार, ग्रामपंचायत मालमत्ता असलेल्या विठ्ठल मंदिराच्या जागेवर बळजबरीने वाळू, पत्र्याचे शेड, जनावरांचा गोठा आदी बांधकाम करण्यात येत असून संबंधित जागेचा समाजोपयोगी कार्यक्रमांसाठी वापर केला जात होता. या अतिक्रमणामुळे धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांमध्ये अडथळे निर्माण होत असल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे.

ग्रामस्थांनी संबंधितांना अनेक वेळा समज देण्याचा प्रयत्न केला, मात्र अतिक्रमण हटविण्यास नकार देत उलट धमकी दिल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

त्यामुळे विठ्ठल मंदिराच्या पावित्र्याचे रक्षण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून अतिक्रमण हटवावे, अशी मागणी करण्यात आली आहे.अश्या अशायाचे निवेदन देण्यात आले आहे. निवेदनावरील सह्या गजानन भानुसे, तुकाराम खवल, भानदास खवल, गोकुळ खवल,सुरेश शिंदे, दत्ता शिंदे,भाऊराव पवार,विष्णू हरदास,बापूराव मोगरे,प्रकाश शिंदे,दिलीप कदम,विष्णू तांबे,राजेभाऊ तांबे,गणेश खवल,महादेव खराबे,नारायण गायकवाड,भाऊराव भारुड, दत्ता खवल, लक्ष्मण खवलं,गोविंद जाधव,श्रीकृष्णा लहाने, आदीं गावकऱ्यांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद येथे जागतिक तंबाखु विरोधी दिनानिमित्ताने शपथ

**जालना - प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, सहारा सामाजिक विकास संस्था, तेजस जनविकास संस्था, यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक तंबाखु विरोधी दिनानिमित्ताने जिल्हा परिषद येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात अधिकारी, कर्मचारी यांना तंबाखु मुक्तीची शपथ देण्यात आली यावेळी- नशा मुक्त भारत अभियांनाची या कार्यक्रमात नशाबंदी मंडळाच्या वतीने पोस्टर प्रदर्शने करण्यात आले.

जिल्हा संघटक तथा सहारा संस्थेचे अध्यक्ष बिस्मिल्ला सय्यद यांनी तंबाखू विरोधी दिनाचे महत्त्व अधोरेखित करुन तंबाखूचे दुष्परिणाम व व्यसनामुळे होणाऱ्या गंभीर आजार विषयी माहिती दिली.

यावेळी जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने हजर होते. या कार्यक्रमाचे संचलन तेजस जनविकास संस्थेचे अध्यक्ष शिवाजी तायडे यांनी केले तर आभार समाजकल्याणचे राम मांटे यांनी व्यक्त केले. समाज कल्याण विभागाचे सर्व कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# परतूरात डॉ.राजगोपाल तापडिया यांचा रक्कदानाचा ९४ वा टप्पा पार

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर येथील नामांकित वैद्यकीय व्यावसायिक डॉ.राजगोपाल तिपडिया यांनी वयाच्या १६ व्या वर्षापासून आतापर्यंत ९४ वेळा रक्तदान केले आहे.हा टप्पा पूर्ण करत अवघ्या शतकाकडे यशस्वी वाटचाल करीत लवकर आपले शतक पूर्ण करतील.रक्तदान करत परतूर मतदारसंघात आपला परिचय निर्माण करत शतकाकडे वाटचाल करनारे तालुक्यातीलचं नव्हे तर जिल्ह्यातील पहिलेचं डॉक्टर आहेत.वैद्यकीय क्षेत्रात आपल्या व्यस्त जीवनात त्यांनी वेळात वेळ काढत अनेक वेळा प्रत्यक्ष रक्तदान शिबिरात अनेक वेळा



खाजगी ठिकाणी रक्तदान करत कार्याची प्रसिद्धी दिली आहे. व्यक्तिमत्वाचा व सामाजिक बांधिलकीचे शहरात सर्वत्र कौतुक होत आहे.शहरातील एका खाजगी रुग्णालयाच्या वर्धापन दिनानिमित्त विशेष रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबीरात समाजातील विविध स्तरातील नागरिकांनी सहभाग घेतला होता.मात्र सर्वांचे लक्ष वेधून घेतले ते डॉ.राजगोपाल तापडिया यांच्या विक्रमी रक्तदानाने ९४ वे रक्तदान ठरले. त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत रक्तदानाचा हा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.